# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/रापनों-२०२४/प्र.क्र.२४/का.११
१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन,हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र२२८७६२२६. Email- sec.mh@gov.in
दि. ०७ नोव्हेंबर २०२५

प्रति,
विभागीय आयुक्त (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)
महानगरपालिका आयुक्त (सर्व)

**विषय** :- 'प्रमुख प्रचारक( Star Campaigner) च्या संख्या २० वरुन ४० करण्याबाबत...

**संदर्भ**:- १)महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५, दि. ५ मे २०२५.

महोदय,

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी प्रमुख प्रचारकांची असलेली २० ही मर्यादा वाढवून ४० करण्यात यावी, अशी मागणी विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी, राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयात मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची दि. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या बैठकीत केली होती.

सदर विषयाच्या अनुषंगाने 'महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश,२०२५' हा आदेश दि. ०५ मे २०२५ रोजी राज्य निवडणूक आयोगाने राजपत्रात प्रसिध्द केला आहे. या आदेशातील 'भाग पाच' मधील **परिच्छेद २६** मध्ये प्रमुख प्रचारकांसदर्भातील माहिती नमूद केली आहे.

राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी केलेली मागणी आणि उपरोक्त संदर्भाकिंत नमूद आदेशातील 'भाग पाच' मधील **परिच्छेद २६(२)** आणि **२७ (१)** अन्वये प्राप्त अधिकारानुसार खालीलनुसार बदल करण्यात येत आहे:-

सर्व साधारणपणे सर्व राजकीय पक्षांना आता २० ऐवजी ४० प्रमुख प्रचारकांची यादी सादर करता येईल. सदर यादी संबंधित जिल्हाधिकारी किंवा महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे सादर करावी लागेल. अन्य तरतुदी व प्रक्रिया उपरोक्त संदर्भाकिंत आदेशात नमूद केल्याप्रमाणे कायम राहतील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या मान्यतेनुसार,

आपला,

०७.११.२०२५

(सुरेश काकाणी)
सचिव
राज्य निवडणूक आयोगमहाराष्ट्र ,

**प्रत माहितीसाठी:** राज्य निवडणूक आयोगाकडील सर्व नोदणीकृत राजकीय पक्ष.